


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २१२ ●शनिवार,दि.०१ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# "सारखं फुकटात, सारखं फुकटात; सारखं माफ, कसं व्हायचं"

## कर्जमाफीवरुन अजित पवारांनी शेतकऱ्यांना सुनावलं




**पुणे । प्रतिनिधी**

'शून्य टक्के व्याजदराने पैसे दिल्यावर तुम्हीपण वेळच्या वेळी पैसे फेडायची सवय लावा ना. सारखंच फुकटात, सारखंच फुकटात आणि सारखंच माफ, सारखंच माफ; कसं व्हायचं? असे म्हणत अजित पवारांनी कर्जमाफीच्या मागणीवरून शेतकऱ्यांना सुनावले. सोमेश्वर सहकारी साखर कारखाच्या ६४ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ झाला. या कार्यक्रमात बोलताना अजित पवारांनी सातत्याने शेतकरी कर्जमाफी करण्यावरून नाराजी व्यक्त केली. अजित पवार म्हणाले, खूप मोठ्या प्रमाणावर आम्ही सवलती देतोय. योजना देतोय. हे सगळं देताना एक लाख कोटीपेक्षा जास्त रक्कम लागते. आम्ही जाहीरनाम्यात लिहिलं होतं. शेवटी आम्हाला करता येईना. काल या नेते मंडळींना, बच्चू कडू, राज शेट्टी, अजित नवले खूप जण आम्ही बसलो होतो. आम्ही चर्चा करून तो निर्णय ३० जूनला घ्यायचं ठरवलं. किती एकरपर्यंत द्यायची ते आम्ही तुम्हाला एप्रिलमध्ये सांगू, अशी माहिती त्यांनी दिली. 'सारखेच फ ु कटात, सारखीच कर्जमाफी; असे चालत नाही' तुम्हीपण शून्य टक्के व्याजाने पैसे दिल्यावर वेळच्या वेळी पैसे फेडायची सवय लावा ना. सारखंच फुकटात, सारखंच फुकटात आणि सारखंच माफ, सारखंच कसं व्हायचं? असं नाही चालत, अशा शब्दात अजित पवारांनी कर्जाची माफ, परतफेड न करणाऱ्या शेतकऱ्यांना सुनावले. एकदा साहेबांनी (शरद पवार) कर्जमाफी केली. एकदा देवेंद्र फडणवीसांनी कर्जमाफी केली. एकदा आम्ही उद्धव ठाकरेंच्या सरकारमध्ये केली. आता आम्हाला पुन्हा निवडून यायचं होतं, आम्ही सांगितलं की आम्ही कर्जमाफी करू. करा माफ. लोक काय म्हणतात, तुम्ही सांगितलं ना, मग करा. जो शब्द दिला, ते करताना आज काही हजार कोटी रुपये त्याला लागणार आहेत', असे म्हणत अजित पवारांनी मित्रपक्षांनाही अप्रत्यक्षपणे सुनावले. जितकी मदत करायला पाहिजे, तितकी करेन; पण सारखीच मदत नाही. काही तुम्हीपण हातपाय हलवा, असे अजित पवार ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही म्हणाले.

## त्या भगिनीचा आदर करतो, मात्र मोबाईल चॅटिंगवरुन भयानक ट्रँगल, तो लोकांसमोर आणण्यासारखा नाही; फलटण प्रकरणावर जयकुमार गोरेंचा दावा




**सोलापूर । प्रतिनिधी**

फलटणमधील डॉक्टर महिलेच्या आत्महत्येवरून जोरदार राजकारण पेटलं असून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी सुरू आहेत. यामध्ये भाजपचे माजी खासदार रणजितसिंह निंबाळकरांचे नाव असल्याचा आरोपही विरोधकांकडून करण्यात आला. विरोधकांच्या या आरोपांना आता राज्याचे मंत्री जयकुमार गोरे (गरूरर्ज्ञीरी त्रेश) यांनी उत्तर दिलं. आम्ही त्या भगिनीचा आदर करतो, मात्र मोबाईल चॅटिंगवरून जो ट्रँगल समोर आला आहे तो लोकांसमोर आणण्यासारखा नाही. त्यामुळे कुणीही यावर राजकारण करू नये असं जयकुमार गोरे म्हणाले. या

▶▶ उर्वरित पान २ वर

## स्व. संपदा ताईंच्या न्यायिक लढ्याची पहिली पायरी, इतक्यावरच थांबायचं नाही, "तोपर्यंत" स्वस्थ बसायचे नाही : धनंजय मुंडे

### स्व. डॉ. संपदा ताई मुंडे आत्महत्या प्रकरणात महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात एस आय टी समिती मार्फत चौकशीचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील फलटण येथे आरोग्य सेवेत कार्यरत असलेल्या व मूळच्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील महिला डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणात सखोल चौकशी करण्यासाठी एका वरिष्ठ आय पी एस दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात एस आय टी समिती स्थापन करून चौकशी करण्याचे निर्देश आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असून,



स्व. संपदा ताई या आपल्या बहिणीच्या न्यायासाठी उभारलेल्या लढ्याची ही पहिली पायरी असून हा लढा इतक्यावरच थांबणार नाही, असे मत माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी एक्स पोस्ट व्दारे व्यक्त केले आहे.

२३ ऑक्टोबर रोजी ऐन भाऊबीजेच्या रात्री डॉ. संपदा मुंडे यांनी आपल्या तळ हातावर सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली होती. मात्र ही आत्महत्या संशयास्पद असल्याचे कुटुंबाने मत व्यक्त केल्यानंतर या प्रकरणाला वेगळे वळण लागले होते.

दरम्यान माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी मयत डॉ. संपदा यांच्या कुटुंबियांची वडवणी तालुक्यातील कौडगाव येथे सांत्वन पर भेट घेतल्यानंतर कुटुंबीयांनी डॉ संपदा यांच्या मृत्यू बाबत अनेक संशय व्यक्त केले होते. संपदा ताई यांनी वैद्यकीय सेवे दरम्यान आपल्यावर वेगवेगळ्या प्रकरणात दबाव आणत नाना प्रकारे त्रास दिला व शारीरिक, मानसिक छळ ▶▶ उर्वरित पान २ वर

## मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देते, रुपाली ठोंबरेंचं मोठं वक्तव्य, पोलीसांसह सरकारचं काम सगळ्यांसमोर आणण्याचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

अत्यंत महत्वाची राजकीय घडामोड समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली ठोंबरे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देते असं वक्तव्य त्यांनी केलं आहे. पुढच्या १ मिनिटात ट्विट करुन राजीनामा देते असंही त्या म्हणाल्या आहेत. राजीनामा दिल्यानंतर पोलीस आणि हे सरकार कसं काम करतं हे सगळ्यांच्या समोर आणणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.



महिला आयोगा प्रमाणेच पोलीस देखील काम करायला लागले आहेत, असे रुपाली ठोंबरे म्हणाल्या. रुपाली ठोंबरे या खडक पोलीस स्टेशनमध्ये पोहोचल्या आहेत. पोलीस वरिष्ठ निरीक्षक शशिकांत चव्हाण यांच्या दालनामध्ये रुपाली ठोंबरे बातचीत करत आहेत. यावेळी त्यांनी पोलीस वरिष्ठ निरीक्षक शशिकांत चव्हाण यांच्या दालनामध्ये ठिय्या मांडल्याचे पाहायला मिळाले. मला अटक करा असेही त्या म्हणाल्या.

▶▶ उर्वरित पान २ वर

## सत्याचा झेंडा उंचावणारा — अभिजीत पवार ठरला आदर्श पत्रकार पुरस्कार विजेता झंकारणारा!

### सत्याची मशाल पेटवणारा, समाजहिताचा दीप उजळवणारा – तोच ठरला आदर्श पत्रकार अभिजीत पवार

**बीड । प्रतिनिधी**

पत्रकारिता ही केवळ लेखणीचे सामर्थ्य नसते, ती असते जनतेच्या भावनांचा आवाज, समाजातील सत्याचा आरसा आणि न्यायाचा प्रहरी. या सर्व मूल्यांना जपत, सत्य आणि प्रामाणिकतेच्या



मार्गावर अविचल राहून काम करणाऱ्या बीड जिल्ह्यातील तरुण पत्रकार अभिजीत रामेश्वर पवार यांनी आपल्या कार्यातून आज एक नवा इतिहास घडवला आहे. स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य ▶▶ उर्वरित पान २ वर

## पदवीधर मतदार नोंदणीचे अर्ज नियमानुसार ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही पध्दतीने स्विकारावे – विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने दि.१२.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीची जाहीर सूचना दिनांक ३०.०९.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून मतदार नोंदणीचे अर्ज प्राप्त होण्यास सुरुवात झाली आहे. मतदार नोंदणीचे अर्ज ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पध्दतीने स्विकारण्याबाबत आयोगाच्या सूचना आहेत. परंतू विभागातील काही कार्यालयाकडून पदवीधर मतदार नोंदणीचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने न करता ऑनलाईन करण्यात यावेत असे सांगण्यात येत असल्याची तोंडी तक्रारी येत असल्यामुळे, पदवीधर मतदार नोंदणीचे अर्ज नियमानुसार ऑनलाईन ▶ उर्वरित पान २ वर

## डॉ. संपदा मुंडे प्रकरणात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे निर्देश

### सातारा जिल्हा रुग्णालयाने दोन वर्षांचा विशाखा समिती अहवाल सादर करावा; पोलीस अधीक्षक कार्यालयाने चार्जशीट वेळेत दाखल करावे

**मुंबई । प्रतिनिधी**

फलटण तालुक्यातील डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणात विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी सातारा जिल्हा रुग्णालय प्रशासनाला मागील दोन वर्षांचा विशाखा समितीचा अहवाल तात्काळ सादर करण्याचे



निर्देश दिले. तसेच सातारा पोलीस अधीक्षक कार्यालयाने या प्रकरणातील चार्जशीट वेळेत दाखल करावे असे आदेशही दिले.

या प्रकरणातील कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीला डॉ. कादंबरी बलकवडे आयुक्त आरोग्य सेवा, डॉ. नितीन अंबाडेकर ▶ उर्वरित पान २ वर

## ज्याला माऊली कळाले, त्याला सगळेच संत कळाले विष्णुपंत लोंढे गुरुजी यांचे प्रतिपादन



**बीड । प्रतिनिधी**

हरि उच्चारणीं अनंत पापराशी जातील लयासी क्षणमात्रें या ज्ञानोबारायांच्या दिव्य अभंगावर आधारित चिंतनात वारकरी संप्रदायाचे ज्येष्ठ कीर्तनकार विष्णूपंत लोंढे गुरुजी यांनी माऊलींच्या चरित्रातील अलौकिकता उजागर केली. त्यांनी प्रतिपादन केले की – ज्याला माऊली कळले, त्याला सगळेच संत कळाले. श्री क्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत विभूती श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज गिरी यांच्या सुविद्या धर्मपत्नी कैवल्यमूर्ती वै. ह. भ. प. भागीरथीबाई ज्ञानेश्वर माऊली महाराज ▶▶ उर्वरित पान २ वर

## शेतकऱ्यांच्या विश्वासाच्या बळावरच जय भवानीची प्रगती होत आहे : चेअरमन अमरसिंह पंडित

### जय भवानीच्या ४3 व्या गळीत हंगामाचा मान्यवरांच्या शुभहस्ते शुभारंभ

**गेवराई । प्रतिनिधी**

कारखान्यासारख्या संस्थेच्या हितासाठी सवंग लोकप्रियतेकडे दुर्लक्ष करून काही कठोर निर्णय केले, प्रसंगी अनेकांची नाराजी स्विकारली परंतु कधीच तत्वाशी तडजोड केली नाही. त्यामुळेच शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करण्यात यश आले. शेतकऱ्यांच्या विश्वासाच्या बळावरच जय





भवानीची प्रगती होत आहे. कारखाना पन्नासाव्या वर्षात पदार्पण करत असताना गाळप क्षमता वाढविताना तांत्रिकदृष्ट्या कारखाना सक्षम करण्यात आपण यशस्वी झालो आहोत. या हंगामात नऊ लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट असून कार्यक्षेत्रातील नोंदणी केलेल्या ऊसाचे संपूर्ण गाळप

▶▶ उर्वरित पान २ वर



# राष्ट्रीय लेखक दिन : समाजाचे आरसे आणि परिवर्तनाचे शिल्पकार

लेखन हे केवळ शब्दांची मांडणी नव्हे, तर समाजाच्या विचारसंस्कृतीचे, भावविश्वाचे आणि काळाच्या स्पंदनाचे दस्तऐवजीकरण असते. म्हणूनच लेखक हा समाजाचा सजग साक्षीदार, चिंतक आणि परिवर्तनाचा वाहक असतो. दरवर्षी १ नोव्हेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय लेखक दिन (National Authors Day) हा दिवस या शब्दशिल्पींच्या कर्तृत्वाला, चिंतनाला आणि समाजातील योगदानाला सलाम करणारा दिवस आहे. साहित्य, समाजशास्त्र आणि सांस्कृतिक परंपरेच्या संगमातून लेखक समाजाला आरसा दाखवतो, प्रश्न विचारतो आणि कधी कधी त्या समाजाला बदलाच्या दिशेने नेतो. या दिवसाचे महत्त्व फक्त लेखकाच्या गौरवापुरते मर्यादित नाही; ते सामाजिक जाणीवेचा, वैचारिक संवादाचा आणि सांस्कृतिक बांधिलकीचा उत्सव आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, लेखकाचे कार्य हे समाजरचनेच्या विविध घटकांशी निगडित असते. एमिल दुर्खाईमसारख्या समाजशास्त्रज्ञाने 'सामाजिक वास्तव' (Social Facts) या संकल्पनेद्वारे सांगितले की, समाजातील मूल्ये, विचार आणि नैतिकता ही व्यक्तीच्या पलीकडील एक सामूहिक शक्ती आहे. लेखक हीच सामूहिकता आपल्या शब्दांतून प्रतिबिंबित करतो. तो समाजातील वास्तव अनुभवतो, त्याचे अर्थ लावतो आणि त्यावर भाष्य करून समाजाच्या आत्मस्मृतीचा भाग बनतो. म्हणूनच प्रत्येक युगाचा लेखक त्या काळाच्या सामाजिक इतिहासाचा जिवंत साक्षी असतो. त्याची लेखणी काळाला दिशा देते आणि समाजाला अंतर्मुख करते.

भारतीय समाजाच्या संदर्भात पाहता, लेखन हे केवळ अभिव्यक्तीचे साधन नव्हते, तर सामाजिक संवाद आणि परिवर्तनाचे शक्तिशाली माध्यम राहिले आहे. संतकाव्याची परंपरा असो किंवा सुधारक चळवळीतील लेखन, भारतातील लेखकाने नेहमी सामाजिक जबाबदारी स्वीकारली आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत कबीर यांनी शब्दांच्या माध्यमातून समतेचा आणि मानवतेचा संदेश दिला. पुढे राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, प्रबोधनकार ठाकरे, प्रेमचंद, शरतचंद्र, आचार्य अत्रे, अण्णाभाऊ साठे यांसारख्या लेखकांनी आपल्या काळातील विषमता, जातिभेद, शोषण आणि अन्याय याविरुद्ध लेखणी उचलली. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे तर, हे लेखक 'सामाजिक बदलाचे शिल्पकार' होते, जे समाजातील मूल्यव्यवस्थेला आव्हान देऊन नवी जाणीव निर्माण करीत होते.

लेखन ही समाजातील सांस्कृतिक भांडवलाची निर्मिती असते. पिएर बोर्द्यू यांनी 'Cultural Capital' (सांस्कृतिक भांडवल) या संकल्पनेतून सांगितले की, ज्ञान, भाषा, अभिरुची, आणि प्रतीकात्मक मूल्ये ही समाजातील सत्ता-संबंध ठरवतात. लेखक हाच या सांस्कृतिक भांडवलाचा निर्माता असतो. त्याच्या लेखनातून नवे शब्द, नवी अर्थसृष्टी आणि नवे विचार उदयाला येतात. जेव्हा लेखक समाजातील वंचित, शोषित, अल्पसंख्याक वा उपेक्षित घटकांचा आवाज बनतो, तेव्हा तो समाजातील सत्ता-संबंधांमध्ये असंतुलन दाखवतो आणि न्याय्य रचनेसाठी संघर्ष करतो. म्हणून लेखक हा केवळ सर्जक नसतो, तर सामाजिक न्यायाचा वाहक असतो.

आधुनिक काळातही लेखनाचे स्वरूप बदलले असले तरी त्याची सामाजिक जबाबदारी कायम आहे. डिजिटल माध्यम, सोशल मीडिया, ब्लॉग, ई-पत्रिका यामुळे अभिव्यक्तीची क्षेत्रे विस्तारली आहेत, पण लेखकाचे काम तितकेच कठीण झाले आहे. कारण माहितीचा ओघ, दिशाभूल आणि भावनिक ध्रुवीकरण या नव्या आव्हानांनी लेखकाच्या स्वातंत्र्यावर नवे प्रश्न निर्माण केले आहेत. समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट मार्क्युसे यांनी 'Repressive Tolerance' (दमनकारी सहिष्णुता) या संकल्पनेद्वारे सांगितले होते की, आधुनिक समाजात स्वातंत्र्य दिले जाते पण त्याच स्वातंत्र्यातून नियंत्रणही ठेवले जाते. आजच्या काळातील लेखक या नियंत्रणाविरुद्ध, मतस्वातंत्र्याच्या आणि विवेकाच्या बाजूने उभा राहणे आवश्यक आहे. कारण लेखकाचे मौन हे सत्तेचे बळ बनते, तर त्याचा उच्चार समाजाच्या विवेकाचे द्योतक ठरतो.

◆ पान ९ वरून पुढे...

## त्या भगिनीचा....

प्रकरणाचा तपास सुरू असून न्यायालय आरोपींना शिक्षा देईल असंही ते म्हणाले. डॉक्टर महिलेला न्याय मिळाला पाहिजे, त्यासाठी मुख्यमंत्र्यांनी योग्य ते निर्देश दिले आहेत. पण विरोधकांकडून सातत्याने या तपास यंत्रणावर शंका उपस्थित करण्याचं काम सुरू आहे असं गोरे म्हणाले. या घटनेमध्ये सर्व पुरावे समोर असून त्या आधारे तपास होईल आणि आरोपींना शिक्षा मिळेल असंही ते म्हणाले या प्रकरणात मृत्यू पावलेली संपदा मुंडे आणि दोन आरोपी यांचे मोबाईल पाहिल्यानंतर परिस्थिती खूप गंभीर वेगळी असल्याचा दावा जयकुमार गोरे यांनी केला. तिन्ही मोबाईल बघितल्यानंतर जो ट्रँगल समोर येत आहे तो खूप भयानक आहे आणि ती परिस्थिती लोकांसमोर आणण्यासारखा नाही. आता या मृत्यूवर सुरू असलेले राजकारण थांबवावे आणि वस्तूदर्शक सुरू असलेला तपास होऊन न्यायालयातून आरोपींना शिक्षा मिळू दे असं जयकुमार गोरे म्हणाले. संपदा मुंडे हिला न्याय मिळेल, न्यायालय यातील आरोपींना शिक्षा सुनावेल. मात्र तिच्या मृत्यूवरून आपली राजकीय पोळी भाजणाऱ्यांनी असले काम बंद करावे असा टोला जयकुमार गोरे यांनी लगावला. मुख्यमंत्र्यांनी तपास यंत्रणांशी बोलून आणि सविस्तर माहिती घेऊन क्लीन चीट दिली. मात्र कोणावरही आरोप करण्याचे लायसन्स तुम्हाला कोणी दिले असा सवालही जयकुमार गोरे यांनी केला. फलटण प्रकरणात सीसीटीव्ही फुटेज आहे, तिन्ही मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. कधी हस्ताक्षर तिचे नसल्याचे आरोप होतात, मग कुटुंबीय हे हस्ताक्षर तिचेच असल्याचे सांगतात. या जप्त केलेल्या तिन्ही मोबाईल मधील चॅटिंग बघितलं तर परिस्थिती खूप वेगळी आहे. आपण मृत भगिनीचा आदर करतो आणि त्यामुळेच पोलीस ही वस्तुस्थिती समोर आणत नाहीत. मात्र याचा गैरफायदा घेत काही लोकं घाणेरडे राजकारण करत आहेत. वस्तुस्थिती सोडून संपदा मुंडे हिच्या मृत्यूचे राजकारण करीत तिसऱ्याच कोणाचे तरी नाव घेत आकांडतांडव करण्याचे काम स्थानिक नेते करीत आहेत. संपदाच्या मृत्यूच्या अडून आपले राजकीय पुनर्वसन होईल अशी भोळीभाबडी अशा तुम्ही ठेवत असाल तर ते चुकीचे आहे. जनतेने तुम्हाला ४० वर्षे पाहिले आहे असा टोला जयकुमार गोरे यांनी रामराजे निंबाळकर यांचे नाव न घेता लगावला.

## स्व. संपदा ताईंच्या...

केल्याचे स्वतः अनेकदा विविध तक्रारींच्या माध्यमातून शासन प्रशासनास लेखी कळवले होते. मात्र त्याची दखल न घेत लैंगिक, शारीरिक व मानसिक छळ केला तसेच त्यांची आत्महत्या देखील संशयास्पद परिस्थितीत झाली. त्यामुळे मृत्यू आधी व नंतरच्या अनेक घडामोडी संशयास्पद होत्या, असे मत धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले होते. दरम्यान या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एका वरिष्ठ महिला आय पी एस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात स्वतंत्र एस आय टी समिती स्थापन करावी, त्यात सातारा जिल्ह्यात कार्यरत अधिकारी - कर्मचारी नेमण्यात येऊ नयेत व वस्तुनिष्ठ चौकशी केली जावी आणि संपदाच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या प्रत्येकाला कठोर शिक्षा व्हावी, अशी अपेक्षा मुंडेंनी राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांकडे व्यक्त केली होती. दरम्यान या प्रकरणात स्व. डॉ. संपदा यांच्या कुटुंबीयांसह अनेक सामाजिक व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आवाज उठवला असून आज मागणी प्रमाणे एस आय टी समिती स्थापन करण्यात येत असल्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी

◆ पान ९ वरून पुढे...

गृह विभागास दिले आहेत. स्व. संपदा मुंडे यांच्या न्यायाच्या लढाईत हे पहिले पाऊल असून, डॉ. संपदा या आपल्या बहिणीस छळलेल्या प्रत्येक गुन्हेगारास गजाआड करेपर्यंत मी किंवा या लढ्यातील कुणीही शांत व स्वस्थ बसणार नाही, असे मत धनंजय मुंडे आपल्या एक्स पोस्ट व्दारे व्यक्त केले आहे.

## मी राष्ट्रवादी काँग्रेस....

रूपाली ठोंबरे पाटील यांच्या बहिणीसह चार जणांविरुद्ध खडक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. माधवी खंडाळकर यांनी खडक पोलीस स्टेशनमध्ये येऊन तक्रार दिल्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रुपाली पाटील खडक पोलीस स्टेशनमध्ये दाखल होत पोलिसांना जाब विचारत आहेत. गुन्हा कसा दाखल केला? असा सवाल रुपाली ठोंबरे यांनी केला आहे. पुण्यामध्ये नसतानाही रुपाली ठोंबरे यांच्यावरती गुन्हा दाखल केल्याने त्या आक्रमक झाल्या आहेत. पोलिसांवर राजकीय दबाव असल्याने माझ्यावर चिखल उडवण्यात आला आहे असा आरोप रुपाली ठोंबरे पाटील यांनी केला आहे. अजूनही रुपाली ठोंबरे पाटील पुण्यातील खडक पोलीस स्टेशनमध्ये बसून आहेत. त्यांची सध्या वरिष्ठ पोलिसांची चर्चा सुरु आहे. पुण्यातील माधवी खंडाळकर या महिलेने फेसबुक लाईव्ह करुन रुपाली ठोंबरे यांच्यावर गंभीर आरोप केल्यानंतर हा वाद अधिकच टोकाला केल्याचं दिसून येतं. रुपाली ठोंबरे पाटील यांनी गुंड पाठवून मारहाण करण्यात आल्याचा दावा एका महिलेने केला होता, याबाबतचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. गुंड पाठवून अमानुषपणे मारहाण केल्याचा आरोप या महिलेने केला होता. मारहाणीनंतर ही महिला रक्तबंबाळ झाल्याचं व्हिडीओमध्ये दिसून येत होतं. रूपाली ठोंबरे पाटील यांच्या विरोधात पोस्ट केल्याने मारहाण केल्याचा आरोप त्या महिलेने केला होता. माधवी खंडाळकर असं या महिलेचं नाव आहे.

## सत्याचा झेंडा...

यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय सन्मान सोहळा २०२५ मध्ये अभिजीत पवार यांना आदर्श पत्रकार पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या पत्रकारितेतील चिकाटी, प्रामाणिकता आणि समाजाभिमुख कार्याची अधिकृत दखल म्हणावी लागेल. अभिजीत पवार यांनी अत्यंत सामान्य कुटुंबातून आपला प्रवास सुरू केला. लहानपणीच लेखणीशी ओढ निर्माण झालेली. गावातील एखादी अन्यायाची घटना, समाजातील बदल, आणि प्रशासनाकडे दुर्लक्षित होत असलेले विषय – हे सगळं त्यांनी आपल्या लेखणीतून पुढे आणलं. त्यांची पत्रकारिता ही नेहमीच निर्भीड पण बांधिलकीची राहिली आहे. सत्य सांगणं हे सोपं नसतं, पण तेच माझं कर्तव्य आहे, अशी भूमिका त्यांनी सदैव घेतली. त्यांच्या या तत्त्वनिष्ठ भूमिकेमुळे ते केवळ एक पत्रकार नव्हे तर जनतेचा आवाज बनले आहेत. पुरस्कार स्वीकारताना त्यांच्या डोळ्यांत समाधानाची चमक होती. पण त्याहून अधिक आनंद त्यांच्या कुटुंबाच्या चेहऱ्यावर दिसत होता. आई-वडील, चुलती, ड . मार्गदर्शक संतोष घोलप साहेब आणि नातेवाईक या सर्वांनी त्यांच्या यशाचा क्षण प्रत्यक्ष अनुभवला. आईच्या डोळ्यांतून आनंदाश्रू झळकले, तर वडिलांच्या चेहऱ्यावर अभिमान झळकला हा क्षण केवळ पुरस्काराचा नव्हता, तर एका कुटुंबाच्या संघर्षाचा विजय होता. अभिजीत पवार यांनी आपल्या लेखणीतून ग्रामीण

◆ पान ९ वरून पुढे...

भागातील जनतेच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविल्या. शेतकऱ्यांच्या अडचणी, युवकांचे रोजगारप्रश्न, आरोग्य आणि शिक्षणातील तफावत, महिला सक्षमीकरण यासारख्या असंख्य विषयांवर त्यांनी अनेक वेळा परिणामकारक बातम्या केल्या. त्यांच्या रिपोर्टिंगमुळे अनेक वेळा प्रशासनालाही कार्यवाही करावी लागली. माऊली न्यूज मीडिया या डिजिटल माध्यमातून त्यांनी जनतेचा आवाज या संकल्पनेला खऱ्या अर्थाने न्याय दिला अभिजीत यांच्या यशामागे त्यांच्या आई-वडिलांचा त्याग आणि संस्कार आहे. त्यांनी नेहमीच मुलाला प्रामाणिक मार्गाने पुढे जाण्याचे संस्कार दिले. त्यांची चुलती आणि नातेवाईकही त्यांच्यासोबत प्रत्येक टप्प्यावर उभे राहिले. आज अभिजीतच्या या सन्मानात त्यांच्या कुटुंबाची मेहनत आणि आशिर्वाद दोन्ही दिसून येतात. सत्याचा झेंडा उंचावणारा, लेखणीतून प्रकाश पाडणारा आणि समाजहितासाठी झटणारा असा हा तरुण पत्रकार आज प्रत्येकाला प्रेरणा देऊन गेला आहे.

## पदवीधर मतदार....

व ऑफलाईन दोन्ही पध्दतीने स्विकारावेत, याबाबतची सूचना जिल्हास्तरावरुन सर्व संबंधितांना निर्गमित करण्यात याव्यात अशा सूचना विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांना दिल्या आहेत.

## डॉ. संपदा मुंडे...

संचालक आरोग्य सेवा हे समक्ष उपस्थित होते. तर दुरदृश्य प्रणालीद्वारे पोलीस अधीक्षक सातारा श्री. तुषार दोषी , जिल्हा चिकित्सक सातारा डॉ. युवराज कर्पे , धुमाळ वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय फलटण डॉ. अंशुमन धुमाळ, डॉ. आर. बी पवार उपसंचालक पुणे, सहभागी झाले होते. तसेच, राज्य महिला आयोग माजी सदस्या व शिवसेना महिला आघाडी पदाधिकारी संगीता चव्हाणही यावेळी

## ज्याला माऊली....

गिरी यांच्या दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त सुरु असलेल्या भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहात भक्ती, नामस्मरण आणि प्रवचनांचा जल्लोष अनुभवास येत आहे. या हरिनाम सप्ताहाचे आयोजन ह. भ. प. महादेव महाराज तात्या व ह. भ. प. नारायण महाराज भाऊ यांच्या पवित्र मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. आठवडाभर सुरू असलेल्या या सप्ताहात दररोज सकाळ-संध्याकाळ भजन, कीर्तन आणि नामस्मरणाने वातावरण मंगलमय होत आहे. विष्णूपंत लोंढे गुरुजींनी आपल्या प्रवचनात संत ज्ञानेश्वरांच्या अलौकिक लीलांचा उल्लेख करत सांगितले की रेड्याच्या मुखातून वेद बोलविले, जड भिंती चालविल्या अशी माऊलींची कृपा आणि सामर्थ्य अपार आहे. जो माऊलींच्या नामात तल्लीन होतो, त्याचे सर्व पाप क्षणात नष्ट होतात.गुरुजींनी पुढे सांगितले की वारकरी संप्रदायात नामस्मरणाला सर्वात मोठे स्थान आहे. हरि या नावाचा उच्चारही अनंत पापांचे क्षालन करतो. दिंडीत चालताना किंवा दैनंदिन जीवनात सतत देवाचे नाम घेत राहिल्यास पुण्य आणि भाग्य लाभते, असे ते म्हणाले. या हरिनाम सप्ताहाला परिसरातील हजारो भाविकांची उपस्थिती लाभत असून संपूर्ण गावात अध्यात्मिक वातावरण दाटले आहे. दिव्य किर्तनांमधून आणि हरिपाठांमधून भक्तांचा आत्मिक संवाद माऊलींशी जुळत आहे. हरिनाम म्हणजेच मुक्तीचा महामार्ग – हरि उच्चारणीं अनंत पापराशी जाईल लयासी

◆ पान ९ वरून पुढे...

क्षणमात्रें अशा भक्तिरसात चिंतन, नामस्मरण आणि श्रद्धेने ओथंबलेला हा हरिनाम सप्ताह खरोखरच संत परंपरेचा उज्ज्वल सोहळा ठरत आहे.

## शेतकऱ्यांच्या विश्वासाच्या....

होईपर्यंत कारखान्याचा पट्टा पडणार नाही असे प्रतिपादन जय भवानीचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी केले. नारायणगडचे महंत ह.भ.प.शिवाजी महाराज, कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित यांसह मान्यवरांच्या शुभहस्ते जय भवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. शुक्रवार, दि.३१ ऑक्टोबर रोजी जय भवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ दिमाखदार सोहळ्यात संपन्न झाला. श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.महंत शिवाजी महाराज, कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित, चेअरमन अमरसिंह पंडित, व्हा.चेअरमन भाऊसाहेब नाटकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार, भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे, खरेदीविक्री संघाचे अध्यक्ष जयदिप औटी, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर यांच्यासह जय भवानीचे आजी-माजी संचालक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह.भ.प. शिवाजी महाराज आणि जय भवानीचे ज्येष्ठ संचालक राजेंद्र वारंगे यांच्या शुभहस्ते विधीवत गव्हाण पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित म्हणाले की, जय भवानी सहकारी साखर कारखाना यावर्षी पन्नासाव्या वर्षात पदार्पण करीत आहे. पन्नास वर्षांच्या काळामध्ये अपेक्षेपेक्षा जास्त कारखान्याने प्रगती केली. आदरणीय शिवाजीराव दादांनी पाहिलेले स्वप्न साकार झाले आहे. ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे कर्मचारी, कामगार, संचालक आणि हितचिंतकांनी केलेल्या सहकार्यातून हे शक्य झाले आहे. शिवछत्र परिवाराने स्थापन केलेल्या सर्व संस्था या लोकांनी दाखविलेल्या विश्वासाच्या बळावर टिकून आहेत. लोकांचा विश्वास संपादन केल्यामुळे जय भवानीची सुध्दा प्रगती होऊ शकली. कारखान्याची गाळप क्षमता वाढविताना अभियांत्रिकी विभागात आपण मोठ्या प्रमाणावर नवीन प्रयोग केले आहेत. जय भवानीने तांत्रिकदृष्ट्या केलेल्या प्रयोगाची दखल राज्यानेच नव्हे तर देशपातळीवर घेण्यात आली आहे. यावर्षीच्या गळीत हंगामासाठी कार्यक्षेत्रात सुमारे १३ लाख मे.टन ऊस लागवड झाली असली तरी जय भवानीकडे नोंदणी झालेल्या सर्व ऊसाचे गाळप करण्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत, असा विश्वास चेअरमन अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. आपल्या भाषणात त्यांनी सिंदफणा नदीवर टाकळगाव बॅरेजच्या मंजुरीसह पैठण उजव्या कालव्याच्या जायकवाडी टप्पा २ मधील कामांच्या मंजुरीमुळे शेतकरी सक्षम होणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविकपर भाषणात कारखान्याचे जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे यांनी कारखान्याच्या संदर्भाने तांत्रिक माहिती उपस्थितांना दिली. ते म्हणाले की, कारखान्याने हार्वेस्टर मालकांशी केलेल्या करारामुळे प्रतिदिन दोन हजार मे.टन ऊसतोडणी हार्वेस्टरद्वारे होणार आहे. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी साखरेला चांगला भाव मिळण्याची अपेक्षा असल्यामुळे ऊसालाही चांगला भाव कारखान्याकडून दिला जाईल. बगॅससह इतर उप पदार्थांचे उत्पन्न अधिकाधिक करण्यावर कारखाना प्रशासन प्रयत्नशील आहे. त्यामुळे यावर्षी कारखान्याच्या उत्पन्न वाढीत भर पडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे महंत ह.भ.प.शिवाजी महाराज यांनी

◆ पान ४ वरून पुढे...

## 'शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर...

हास्य घेऊन शेतकऱ्यांनी शासन आणि प्रशासनाचे आभार मानले . यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी आपल्याला अनुदान मिळाले असल्याचे सांगून समाधान व्यक्त केले व याबद्दल शासनाचे , जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे व सर्व कनिष्ठ अधिकारी , कर्मचारी यांचे आभार मानले . यावेळी मंडळ अधिकारी दीपाली आघाव, ग्राम महसूल अधिकारी प्रदीप गर्जे , प्रशांत नलावडे , श्रद्धा जोगदंड , निखिल राऊत , सहाय्यक कृषी अधिकारी सुनील बहिरवाळ, पांढऱ्याचीवाडी चे उद्योजक राजेभाऊ शेळके , तांदळ्याचीवाडी वाडी चे पोलीस पाटील अर्जुन तांदळे , धावज्याचीवाडीचे सरपंच महेंद्र काटकर , चाकरवाडी चे ग्रामस्थ चंद्रकांत डोईफोडे , बाबासाहेब पवार , अक्षय घोडके , अमर हजारे ,विकास पवार , चक्रधर भोसले, योगेश शेळके , धम्मदिप वंजारे , प्रकाश भोसले , रामा रंगा शेळके, दकर ताटे इत्यादी उपस्थित होते . समारोपाच्या वेळी तहसीलदार शेळके म्हणाले – आमचं खरं समाधान तेव्हाच आहे, जेव्हा शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर पुन्हा हसू उमटेल. हेच आमचं ध्येय आहे . या संवाद उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून, प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची नवी दारे खुली झाली .

## दिंद्रुड पोलिस....

१०० ते १२० तरूणांनी उत्साहाने सहभाग घेतला. मॅरेथॉन शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. सर्व सहभागींना दिंद्रुड पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष अमोल ठोंबरे यांच्या प्रयोजनात व मार्गदर्शक संतोष स्वामी याच्या वतीने प्रशस्तिपत्रक प्रदान करण्यात आले.मॅरेथॉन नंतर फळांचे वाटप पोलीसांनी केले.या उपक्रमास संकल्प अॅकॅडमीचे प्रशिक्षक माधव केंद्रे, संदीप तिडके, प्रा. बाबुराव गित्ते, गणेश होरमाळे, विजय आडे, पत्रकार संतोष स्वामी, नवनाथ कांबळे यांच्यासह नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचा समारोप परिसर स्वच्छ करत करण्यात आला. उपस्थितांचे आभार पोलीस उपनिरीक्षक सलमान शेख यांनी मानले.

## तलवाडा जिल्हा...

गणात सर्व परिचित आसलेले समाज सेवक सय्यद मुख्तार अली यांच्या नावाची जोरदार चर्चा होतांना ऐकावयास मिळत असुन दिनांक

◆ पान ४ वरून पुढे...

३१/१०/२०२५ रोजी गेवराई तालुक्याचे लोकनेते माजी राज्यमंत्री बदामराव (आबा) पंडीत यांनी तलवाडा येथे सय्यद मुख्तार अली यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता होऊ लागलेल्या चर्चेच्या संदर्भाने बदामराव (आबा) पंडीत यांनी सय्यद मुख्तार अली यांच्याशी हितगुज करुन भारतीय जनता पार्टीच्या वतीने तलवाडा जिल्हा परिषद गटातुन जिल्हा परिषद निवडनुक लडवण्याचे संकेत दिले आसल्याची माहिती सय्यद मुख्तार अली यांच्या निकटवर्तीय कडुन समजत आहे. या बाबत समाज सेवक सय्यद मुख्तार अली यांच्याशी विचारपुस केली आसता त्यांनी सांगितले की हि या भागातील जनतेची जन भावना आहे. जनतेच्या जन भावनेचा आदर राखत माझी तय्यारी मी केलेलीच आहे परंतु माझे नेते आदरणीय बदामराव(आबा) पंडीत यांनी मला शब्द दिल्याने मी भारतीय जनता पार्टीच्या वतीने तलवाडा जिल्हा परिषद निवडनुक लडवण्यासाठी सज्ज आहे. आसे सय्यद मुख्तार अली यांनी सांगितले असुन गेल्या तीस ते पस्तिस वर्षा पासुन समाज सेवक सय्यद मुख्तार अली हे बदामराव (आबा) पंडीत यांच्या खांद्याला खांदा लाऊन सत्ता आसो अथवा नसो एक निष्ठेने सोबत आहेत म्हणून जनतेत सय्यद मुख्तार अली यांच्या नावाची होत आसलेल्या चर्चेला अनुसरुण भारतीय जनता पार्टीच्या वतीने तलवाडा जिल्हा परिषद साठी सय्यद मुख्तार अली यांची ऊमेदवारी जवळपास निश्चित मानल्या जात असुन बदामराव (आबा) पंडीत समर्थकासह सर्व सामान्य जनातुन सकारात्मक प्रतिक्रिया ऐकावयास मिळत आहे.

## बीड येथे ...

नगर बीड येथे एसी प्रवर्गातील लाभार्थींसाठी एक दिवशीय उद्योजकता परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. सदरील कार्यक्रमात उद्योग व्यवसाय संदर्भात व प्रशिक्षणाविषयी मार्गदर्शन करून लाभार्थीचे अर्ज भरून घेण्यात येणार आहेत.प्रशिक्षणासाठी पात्रता

वय १८ ते ४५ वयोगटातील एस.एस.सी. उत्तीर्ण युवक, युवती आणि महिला यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, प्रशिक्षणामध्ये ३० लाभार्थी ची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे निवड करण्यात येणार असून स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी प्रशिक्षण प्रवेश अर्ज भरण्यासाठी दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत श्री विजय लोखंडे प्रोग्राम ऑर्गनायझर(एमसीईडी) द्वारा जिल्हा उद्योग केंद्र संचेती बिल्डिंग गुडलक हॉटेल च्या बाजूला जालना रोड बीड येथे संपर्क करावा. असे आवाहन श्री किरण जाधव महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र बीड व दत्तात्रय क्षीरसागर

◆ पान ४ वरून पुढे...

प्रकल्प अधिकारी एमसीईडी बीड, सुदाम थोटे विभागीय अधिकारी एम सीईडी छत्रपती संभाजी नगर यांनी केले आहे.

## विशेष घटक...

आत करावी लागते.अर्जदारास ५ टक्के स्वतः चा सहभाग भरावयाचा आहे. थोडक्यात बँक रक्कम ७५ टक्के महामंडळ २०टक्के व अर्जदाराचा सहभाग ५ टक्के एकूण १०० टक्के ारहरवळीहर.ालिलवल.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन (जपश्रळपश) कर्ज मागणी अर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तरी इच्छुक अर्जदारांना महामंडळाकडुन खालीलप्रमाणे आवाहन करण्यात येत आहे.

अर्जदारांनी त्यांचे स्वतः चे (ए-चरळश्र) ई मेल अकाउंट वापरुन ऑनलाईन (जपश्रळपश) पध्दतीने अर्ज करावा व अर्जाची मुळ प्रत व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जिल्हा कार्यालयात स्वतः सादर करावी. त्रयस्त व्यक्तीकडुन अर्ज किंवा इतर वैधानिक दस्ताऐवज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी अधिक माहितीसाठी लाभार्थ्यांनी जिल्हा व्यवस्थापक महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळ मजला कार्यालयाशी संपर्क साधावा असे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे

## गावक-यानी शिबिराचा...

अंतर्वाला ,तलवडा,मिराकाळा,पौळाचीवाडी,देवपिंपरी,चकलांबा,माटेगाव ,ढालेगाव ,काळेगाव ,या ठिकाणी गोचीड गोमाशा निर्मुलन कार्यमोहीम आयोजीत करून १२००० हजार पेक्षा जास्त जनावरांचे जंतनाशन गोचीड निर्मुलन फवारणी करण्यात आली. तसेच गोटे फवारणी करून बाधीत जनावरांवर ओषधोपचार करण्यात आले पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात आले.या साठी तालुक्यातील डॉ.वैभव राडकर स.आ. पशुसंवर्धन गेवराई व डॉ.व्हि.एस.अंबटी पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती गेवराई डॉ.एम.बी.लकडे प.वि.अ.उमापूर ,डॉ. निलेश सानप प.वि.अ.हिरापूर ,डॉ.श्रुती भोसले प.वि.अ.गढी,डॉ. दत्ता काकडे प.वि.अ.चकलंबा ,डॉ.एस.एम.यादव प.वि.अ.धोंडराई आर.एम.कुरकुटे.स.प.वि.अ.खळेगाव व्हि.यु.सुतार रामपुरी एस.एस. जाधवजातेगाव, किशोर ढाकणे कोळगाव ,श्री.हजारे प.प.पाडळसिंगी श्री.हिवाळे प.प.या सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी अथक परिश्रम

◆ पान ४ वरून पुढे...

घेतले. तरी सर्व गावकर्यांनी शिबिराचा लाभ घेऊन आपल्या पशुधनास योग्य ते उपचार व प्रतिबंधात्मक उपाय करून लाभ घ्यावा आसे आव्हान पशुसंवर्धन खात्या मार्फत डॉ. राजेश्वर कदम जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, बीड आणि डों दत्तात्रय इंगोळे ,सहायक आयुक्त प. सं. जिल्हा पशू सर्व चिकित्सलय बीड यांनी केलेले आहे. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,गोवर्गीय लसीकरण पूर्ण झालेले आहे.तालुक्या अंतर्गत एकूण २५ पशुचिकित्सालय आहेत.व गेवराई तालुक्या मध्ये एकूण १९४ गावे आहेत.पशुसंवर्धन खात्या मार्फत नियोजन व टीम तयार करून प्रत्येक गावात शिबिरे आयोजित केलेली आहेत.शिबिरांच्या माध्यमातून औषधोउपचार व पशुपालका मध्ये जनजागृती करण्यात येत आहे.''गाव तेथे शिबीर '' शेतकऱ्याच्या बांधावर गोठ्या मध्ये फिरते पशुवैद्यकीय वहानाच्या माध्यमातून रोगराई मुक्त तालुका हा विडाच पशुसंवर्धन विभागाने उचलला आहे.या मध्ये फिरते पशुवैद्यकीय वहानाच्या माध्यमातून ,प्रतेक्ष भेटी च्या माध्यमातून प्रत्येक गावात रोगमुक्त शिबीर आयोजित करण्यात आले आहेत. मोजे पाडळशिंगी,तांदळा,कोळगाव,खळेगाव,बंगालीपिंपळा,राजपिंपरी,अडगाव काठोडातांडा श्रीपत अंतर्वाला ,तलवडा,मिराकाळा,पौळाचीवडी,देवपिंपरी,चकलांबा,माटेगाव ,ढालेगाव ,काळेगाव ,या ठिकाणी गोचीड गोमाशा निर्मुलन कार्यमोहीम आयोजीत करून १२००० हजार पेक्षा जास्त जनावरांचे जंतनाशन गोचीड निर्मुलन फवारणी करण्यात आली. तसेच गोटे फवारणी करून बाधीत जनावरांवर ओषधोपचार करण्यात आले पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात आले.या साठी तालुक्यातील डॉ.वैभव राडकर स.आ.पशुसंवर्धन गेवराई व डॉ.व्हि.एस.अंबटी पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती गेवराई डॉ.एम.बी.लकडे प.वि.अ.उमापूर ,डॉ.निलेश सानप प.वि.अ.हिरापूर ,डॉ.श्रुती भोसले प.वि.अ.गढी,डॉ.दत्ता काकडे प.वि.अ.चकलंबा, डॉ.एस.एम.यादव प.वि.अ.धोंडराई आर.एम.कुरकुटे.स.प.वि.अ.खळेगाव व्हि.यु.सुतार रामपुरीएस.एस.जाधव जातेगाव, किशोर ढाकणे कोळगाव ,श्री.हजारे प.प.पाडळसिंगी श्री.हिवाळे प.प.या सर्व अधिकारी आणि कर्मचारीयांनी अथक परिश्रम घेतले.

तरी सर्व गावक-यानी शिबिराचा लाभ घेऊन आपल्या पशुधनास योग्य ते उपचार व प्रतिबंधात्मक उपाय करून लाभ घ्यावा आसे आवाहन पशुसंवर्धन खात्या मार्फत डॉ. राजेश्वर कदम जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, बीड आणि डों दत्तात्रय इंगोळे ,सहायक आयुक्त प. सं. जिल्हा पशू सर्व चिकित्सालय बीड यांनी केलेले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते कृषी यांत्रिकीकरण घटकांतर्गत लाभार्थ्यांना ट्रॅक्टर व औजाराचे वितरण

**• शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर द्यावा – उपमुख्यमंत्री अजित पवार**

बारामती । प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांच्या अंगी कुशलता असून ते अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतमालाच्या उत्पादनात वाढ करीत आहेत; अशा प्रगतशील तंत्रज्ञान आणि त्याम ाध्यमातून कृषीक्षेत्रात होणाऱ्या बदलाविषयी इतर शेतकऱ्यांनीही माहिती घ्यावी, असे आवाहन पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

माळेगाव सहकारी साखर कारखाना येथे आयोजित कार्यक्रमात श्री. पवार यांच्या हस्ते कृषी यांत्रिकीकरण सन २०२५-२६ घटकाअंतर्गत निवड झालेल्या प्रातिनिधिक स्वरूपात ५१ लाभार्थ्यांना डि.बी.टी.द्वारे अनुदानावर ट्रॅक्टर व औजाराचे वितरण करण्यात आले.

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, उप विभागीय कृषी अधिकारी तुळशीराम चौधरी, माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्षा संगीता कोकरे, संचालक मंडळ, सभासद, विविध बँकेचे अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीमुळे (एआय) निर्णयप्रक्रिया डेटा आधारित असल्यामुळे अचूक होते, पिकातील दोष लवकर ओळखता येतात , त्यामुळे पिकाला लागणारे घटकांबाबत वेळेत माहिती मिळते. वीज आणि पाणी वापरात बचत होते, शेतमालाच्या उत्पादनातही वाढ होणार आहे, त्यामुळे वेगाने बदलणाऱ्या काळानुरुप शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला पाहिजे, याकरीता राज्य शासनाच्या वतीने सहकार्य करण्यात येईल.

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी राज्य शासनाने ३२ हजार कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. अजूनही राज्यातील विविध भागात पाऊस पडत असून अशा भागातील झालेल्या नुकसानाचे पंचनामे सुरु करण्यात आहे, त्यामुळे अशा शेतकऱ्यांनाही मदत करण्याकरिता अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्याकरिता कर्जमाफीच्या अनुषंगाने एक समिती गठीत केली आहे. या समितीने केलेल्या शिफारशीच्या आधारावर पुढची प्रक्रिया करून ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.



बारामती तालुक्यातील सुमारे २५ हजार लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर करण्यात आली असून यावर्षी ३५ कोटी रुपयाचे अनुदान करण्यात येणार आहेत. याप्रमाणे राज्यातही अनुदान वितरित करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्नवाढ तसेच विविध योजनांकरिता ५ हजार कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

राज्यातील विविध योजनेतील लाभार्थ्यांना सुमारे १ लाख कोटी रुपयांचा लाभ देण्यात येत आहे. यामध्ये शेतकऱ्याच्या ३, ५ आणि ७.५ अश्वशक्ती असलेल्या कृषी पंपांसाठी वीज देयकाकरिता २५ हजार कोटी रुपये, पीएम-सन्मान निधी करिता ७.५ हजार कोटी रुपये, माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांकरिता ४५ हजार कोटी रुपये, दिव्यांग लाभार्थ्यांना प्रतिम ाह अडीच हजार, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना आणि संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना प्रतिमाह दीडहजार रुपये, ७५ वर्षांवरील नागरिक सर्व प्रकारच्या बसेसमध्ये १०० टक्के म ोफत प्रवास, महिलांना बसेसमध्ये ५० टक्के सवलतीने प्रवास अशा विविध योजनांचा समावेश आहे, असेही श्री. पवार म्हणाले.

# रविवारी दादाहारी महाराज गीते यांच्या प्रवचन सेवेने चातुर्मास उत्सवाची सांगता

बीड । प्रतिनिधी

बार्शी रोडवरील स्वराज्य नगर येथे बीड ह.भ.प. माधव म हाराज डाके (काठवडेकर) यांच्या निवासस्थानी प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या चातुर्मास उत्सवात बीड जिल्ह्यातील सतरा महाराज मंडळीची प्रवचन सेवा या चातुर्मास उत्सवात संपन्न झाली. या उत्सवाची सांगता सोमवार दिनांक /२/११/२५रविवारी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न होत आहे. या चातुर्मास



सांगतेची प्रवचन सेवा बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध प्रवचनकार व ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. दादाहारी महाराज गीते यांच्या प्रवचन सेवेने होणार आहे. चार महिन्याच्या या चातुर्मास उत्सवात स्वराज्य नगर परिसरातील भाविक भक्तांनी नियमित उपस्थिती दर्शवून चातुर्मास उत्सवास उत्स्फ ूर्त प्रतिसाद दिला आणि प्रवचन सवेचा आनंद घेतला. सदरील च्या चार महिन्यांच्या काळात प्रत्येक सोमवारी ज्ञानेश्वरी ग्रंथावर विविध अभ्यासू प्रवचनकारांची चिंतनीय चिंतने ऐकायला मिळाली. येत्या रविवारी प्रबोधिनी एकादशी असल्याने रविवार दिनांक ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रवचन सेवे ने व फराळाने सांगता संपन्न होणार आहे. सदरील सांगते दिवशी प्रवचनानंतर आगळा वेगळा असा दीपोत्सव सोहळा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला स्वराज्य नगर तसेच परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक ह.भ.प. माधव महाराज डाके व सौ स्मितताई माधव डाके व समस्त परिवाराने केले आहे. संपूर्ण चातुर्मास काळात स्वराज्यनगर व परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भाविक भक्त प्रत्येक सोमवारची आतुरतेने वाट पाहत असत.

*भारतीय पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी जी यांच्या स्मृतिदिन रोजी मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र मोहीम राबविली.हि मोहीम शिंदे वस्ती ढेकणमोह येथे वृक्ष वाटप करण्यात आले. व त्यांच्या कार्येबद्दल अध्यक्ष सौ छाया दिलीप पवार यांनी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपस्थित मातोश्री बहुउद्देशीय*



*सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सौ छाया दिलीप पवार, सहसचिव रोहन डोळस, सदस्य व गांवकरी उपस्थित होते*


महाराष्ट्र शासन
वनविभाग
वन्यजीव विभाग छत्रपती संभाजीनगर
वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगावं

## निविदा सुचना

जा.क्र./वपअ./योजना/ 347/2025-25, दिनांक:-30/10/2025

वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव अंतर्गत असलेल्या नियतक्षेत्रातील खालील कामाकरीता मोहरबंद खुल्या पध्दतीने निविदा (बी-1) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय कामाची रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | डोंगरकिन्ही कं.नं. 360B वनतळे अस्तरिकरण करणे . | 464999 | 4650 | 100 |
| 2 | डोंगरकिन्ही कं.नं. 360B वनतळ खोदणे | 738375 | 7383 | 100 |
| 3 | डोमरी कं.नं. 371B गुरे प्रतीबंधक चर खोदणे (TCM) 06 हे | 290702 | 2907 | 100 |
| 4 | नाळवंडी सं.नं. 185 गॅबीयन बंधारे बांधणे. | 814283 | 8143 | 100 |
| 5 | निरगुडी कं.नं.367, गुरे प्रतीबंधक चर खोदणे (TCM) 17 हे | 823655 | 8236 | 100 |
| 6 | बेदरवाडी कं.नं.368, गुरे प्रतीबंधक चर खोदणे (TCM) 12 हे. | 581404 | 5814 | 100 |
| 7 | खडकवाडी कं.नं.369 A गॅबीयन बंधारे बांधणे. | 780500 | 7805 | 100 |
| 8 | डोंगरकिन्ही कं.नं.361 गॅबीयन बंधारे बांधणे. | 814283 | 8143 | 100 |
| 9 | डोमरी कं.नं.372 A गॅबीयन बंधारे बांधणे. | 780500 | 7805 | 100 |
| 10 | डोमरी कं.नं.372 B गॅबीयन बंधारे बांधणे. | 814283 | 8143 | 100 |
| 11 | पिंपळगाव धस कं.नं.363 गॅबीयन बंधारे बांधणे. | 814283 | 8143 | 100 |

**अटी व शर्ती-**

1. आवश्यक त्या विभागाचा नोंदणीकृत ठेकेदार निविदा भरण्यास पात्र असेल.
2. अ) कोऱ्या निविदा विक्री दिनांक 01/11/2025 सकाळी 10:00 वाजेपासुन ते दिनांक 10/11/2025 रोजी संध्याकाळी 05:00 वाजेपर्यत केवळ कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव कार्यालयात उपलब्ध होतील.
   ब) मोहरबंद निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 10/11/2025 रोजी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत.
   क) निविदा उघडण्याचा दिनांक 11/11/2025 रोजी कार्यालयीन वेळेत किंवा प्रशासकीय सोयीनुसार.
3. निविदा पोटी इसारा रक्कम लेखा विभागात रोखीने भरुन पावतीची मुळ प्रत व ठेकेदाराचे आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती लिफाफा क्र. 01 च्या आत ठेवुन व या लिफाफावर अनामत पावतीचा तपशिल लिहून लिफाफा क्र. 01 व लिफाफा क्र. 02 निविदा सीलबंद करुन वनपरिक्षेत्र (वन्यजीव) कार्यालयात दाखल करावेत.
4. इसारा रक्कमेचा डी. डी. हा कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेड्युल बॅकेचा विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) छत्रपती संभाजीनगर यांचे नावाने सादर करावा.
5. सदर कामाचा कालावधी हा चालु 2025-26 या वर्षाचा असुन सर्व कामे याच वर्षात पुर्ण करणे बंधनकारक राहील.
6. या जाहिरातीबाबत अधिक माहिती वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव यांच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे. व अधिकच्या माहितीसाठी या कार्यालयास संपर्क करावा.
7. प्राप्त निविदा पैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार वन्यजीव वनविभाग छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. याची कारणे दिली जाणार नाहीत.

सही/-
वनपरिक्षेत्र अधिकारी,
(वन्यजीव) नायगांव.



## जाहिरनामा

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पाटोदा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत

जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

पाटोदा तालुक्यातील सर्व जनतेस जाहिर केले जाते की, अर्जदार शेख निसार शेख अख्तर रा. पारगाव घुमरा ता. पाटोदा जि. बीड यांनी त्यांचा स्वत:चा जन्म दिनांक १८/०६/१९८७ रोजी मौजे पारगाव घुमरा येथे झाला आहे. त्याच्या जन्माचे आदेश मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे

करिता सदरहु अर्जदाराचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्माचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ई स्वाक्षरीत रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

आदेशावरुन
(स्वाक्षरीत)
शिक्का
दत्तात्रय बळीराम निलावड
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार पाटोदा



## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १५९९/२०२५

मंगल भ्र. बबन येडे वि. निरंक

ज्यापेक्षा बबन रावसाहेब येडे हया दिनांक ११.०९.२०२५ रोजी अंजनवती, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार– १. मंगल भ्र. बबन येडे, वय ७० वर्ष, धंदा शेती, रा. अंजनवती, ता. जि. बीड, २. शिवमूर्ती पि. बबन येडे, वय ४५ वर्ष, धंदा शेती, रा. अंजनवती, ता. जि. बीड, ३. गोकुळ पि. बबन येडे, वय ३६ वर्ष, धंदा शेती, रा. अंजनवती, ता. जि. बीड, ४. भारत पि. बबन येडे, वय ३४ वर्ष, धंदा – शेती, रा. अंजनवती, ता. जि. बीड, ५. शामल भ्र. कृष्णा काळे, वय ३९ वर्ष, धंदा – घरकाम, रा. बोलेगाव, ता. घनसांगवी, जि. जालना

अर्जदार १ ही मयत नामे बबन रावसाहेब येडे यांची पत्नी असून, अर्जदार क्रं. २ ते ४ ही मुले आहेत, तर अर्जदार क्रं. ५ ही मयताची विवाहित मुलगी आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत बबन रावसाहेब येडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख ०८/१२/२०२५ आहे.

आज दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(ॲड. योगेश टेकाडे यांच्यामार्फत)
(स्वाक्षरीत)
क.लिपीक
शिक्का
आदेशावरून
(स्वाक्षरीत)
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड



## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नं. २८३/२०२५

दिपाली व ईतर विरुध्द निल

अर्जदार :– १) दिपाली भ्र. कृष्णा कुमावत वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिरुर कासार, ता. शिरुर कासार, जि. बीड. २) अभिषेक पि. कृष्णा कुमावत वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर.३) अनिकेत पि. कृष्णा कुमावत वय २१ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर.

विरुध्द निल.

अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्यापेक्षा मयत नामे 'कृष्णा पि. सारंगधर कुमावत रा. शिरुर कासार, ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. ११/०१/२०२५ रोजी मौजे दिप हॉस्पिटल, बीड, ता. जि. बीड, येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मुले आहेत. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
पुढील तारीख १७/११/२०२५
(ॲड. एच. एस. कोठुळे. यांच्यामार्फत)

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
'सह. अधिक्षक
(स्वाक्षरीत)
क.लिपीक
शिक्का
दिवाणी न्यायालय, क. स्तर, शिरुर कासार,



## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क.स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नं. २९७/२०२५

लखापती व ईतर विरुध्द निल.

अर्जदार :– १) लखापती भ्र. नागु बहिर वय ७७ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिरुर कासार, ता. शिरुर कासार, जि. बीड, २) कमलबाई भ्र. जिवन बहिर, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर. ३) अभिजित पि. जिवन बहिर वय २३ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. मो. नं. ९१७२१०९९१४. ४) अंजली भ्र. ओमकार साळुंके वय २५ वर्षे, धंदा घरकाम, रा. भैरवनाथ मंदिरा जवळ, मोई, करुळी, पुणे, ता. जि. पुणे.

विरुध्द निल.

अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्यापेक्षा मयंत नामे जिवन पि. नागु बहिर रा. शिरापुर (धुमाळ), ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. २२/०१/२०११ रोजी मौजे लाईफ लाईन मल्टि स्पेसिलीटी हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर, येथे अर्जदारांचे राहते घरी मयत झालेल्या असुन अर्जदार क्र. १ हि मयताची आई असुन अर्जदार क्र. २ हि मयताची पत्नि आहे. तसेच अर्जदार क्र. ३ हा मयताचा मुलगा आहे व अर्जदार क्र. ४ हि मयताची विवाहीत मुलगी आहे. तसेच अर्जदार हे उपरोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ३०/११/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
पुढील तारीख – २९/११/२०२५

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
सह. अधिक्षक
(स्वाक्षरीत)
क.लिपीक
शिक्का
दिवाणी न्यायालय, क. स्तर, शिरुर कासार,



## चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: BED/02177/18/25
फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक: .........
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर बार्शी रोड बीड ता. जि. बीड बाबत
न्यासाचा पत्ता :- बार्शी रोड बीड, ता. जि. बीड, बीड, बीड, बीड
अर्जदार नवनाथ मोतीराम शिराळे,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | The temple is made entirely of stone and the area of the temple is 83.53 sq.m. | 8000000.00 |

**(अ) जंगम मिळकत:- रोख रु. ८०००००० /- मात्र (अक्षरी रुपये ऐंशी लाख मात्र फक्त)**

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Beed | 1-3-784 | Barshi Road, Beed | 8000000 | 5 year | 8000000.00 |

**(ब) स्थावर मिळकत ८०००००० /- (अक्षरी रुपये देशी लाख मात्र फक्त)**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

शिक्का
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड

दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. ०१ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

# 'शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हसू यावं : हाच आमचा दिवाळीचा आनंद'

● बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा शेतकऱ्यांशी थेट संवाद :
● अनुदान, नुकसानभरपाई, आणि शेतीविषयक प्रश्नांवर सखोल मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

शुक्रवार दि ३१ ऑक्टोबर रोजी पांढऱ्याचीवाडी (ता. बीड) येथील सभागृह वेगळ्याच वातावरणाने भरून गेल होत . प्रशासन आणि शेतकरी वर्गाचा थेट संवाद – भावनेने , समजुतीने आणि जबाबदारीने सजलेला . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी येळंबघाट मंडळातील शेतकऱ्यांशी संवाद साधत अनुदान, नुकसानभरपाई , शेतीतील समस्या आणि शासनाच्या योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले .

या संवाद सत्रात नांदूर फाटा , धावज्याचीवाडी , खरड्याचीवाडी , चाकरवाडी या गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते . तहसीलदार शेळके यांनी प्रत्येक शेतकऱ्याचे प्रश्न संयमाने ऐकून घेतले , त्यांच्या अडचणींचे तत्काळ निराकरण करण्याचे



आश्वासन दिले . त्यांनी सांगितले – यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्री महोदय , पालकमंत्री अजितदादा पवार यांचे स्पष्ट निर्देश होते की, शेतकऱ्यांच्या खात्यातील अनुदान दिवाळीपूर्वी जमा व्हावे .त्यानुसार बीड प्रशासनाने त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवली होती .

शेळके पुढे म्हणाले – तुमच्या भागातील सुमारे ९० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा झाले आहे . उर्वरित शेतकऱ्यांनी त्वरित फार्मर आयडी तयार करावेत . तहसीलदार शेळके यांनी यानंतर 'आपले सरकार केंद्र' येथे पाहणी केली . नंतर थेट शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन सहाय्यक स्तरावरील पीक पाहणीचे प्रात्यक्षिक दाखवले . शेतीबरोबरच आपल्या मुलांना चांगले शिक्षण द्या , शासनाच्या योजना समजून घ्या आणि गावातील समस्या थेट आमच्यापर्यंत पोचवा – प्रशासन सदैव तुमच्या सेवेसाठी तयार आहे, असे त्यांनी सांगितले. सभागृहात शेतकऱ्यांनीही त्यांना प्रश्न विचारले , काहींनी अनुदान मिळाल्याची माहिती दिली . चेहऱ्यावर आनंदाचे ▶ उर्वरित पान २ वर

## दिंद्रुड पोलिस ठाण्यातर्फे राष्ट्रीय एकता दिन साजरा

● एकता दौड मॅरेथॉन मध्ये धावली तरूणाई

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे पोलीस स्टेशनच्या वतीने, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिन साजरा करण्यात आला या निमित्ताने शुक्रवारी (दि. ३१ रोजी) पाच किलोमीटरची एकता दौड मॅरेथॉन आयोजित करण्यात आली.याप्रसंगी तरूणांनी उत्साहात सहभाग



घेतला. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित दिंद्रुड पोलीस अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व नागरिकांनी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली. सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली हिरवा झेंडा दाखवून मॅरेथॉनचा प्रारंभ झाला. यावेळी ▶ उर्वरित पान २ वर

## तलवाडा जिल्हा परिषद गटातुन समाज सेवक सय्यद मुख्तार अली यांची जिल्हा परिषद साठी उमेदवारी जवळपास निश्चित

**तलवाडा । प्रतिनिधी**



बीड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या होऊ घातलेल्या सार्वजनिक निवडनुकिच्या आणुषंगाने गेवराई तालुक्यातील विविध गट व गणात इच्छुकांच्या नावाची चर्चा होऊ लागली आसतांनाच तलवाडा जिल्हा परिषद गट व दोन्ही पंचायत समिति गणात जिल्हा परिषद ऊम ेदवाराच्या आणुषंगाने तलवाडा येथीलच रहिवाशी व जिल्हा परिषद गट व दोन्ही पंचायत समिति ▶ उर्वरित पान २ वर

## बीड येथे नि:शुल्क निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे पुरस्कृत आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्र बीड यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जातीतील युवक, युवती व महिलांसाठी एक महिना कालावधीचे बीड नि:शुल्क निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात उद्योगाच्या निवडी पासून ते उभारणीपर्यंत संपूर्ण शास्त्रोक्त प्रशिक्षण देण्यात येणार असून सदरील प्रशिक्षणामध्ये उद्योग संधी लघु उद्योग, सेवा उद्योग, व्यापार उद्योग,उद्योगाची निवड उद्योजकीय गुण विकास, व्यक्तिमत्व विकास, बाजारपेठ पाहणी तंत्र, उद्योग निवड प्रक्रिया, महिला उद्योजकांसाठी धोरणे, उद्योग उभारणी प्रक्रिया, तसेच विविध शासकीय कर्ज व अनुदान योजनांची माहिती देण्यात येईल. कार्यक्रमात यशस्वी उद्योजकांचे अनुभव, प्रकल्प अहवाल , संवाद व विक्री कौशल्य, तसेच उद्योगाचे व्यवस्थापनाच्या मूलभूत तत्त्वांवर विशेष सत्रे घेतली जाणार आहेत. विविध उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रांबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी एम सी ई डी प्रशिक्षण हॉल लोकमत कार्यालयाच्या समोर बलवा बिल्डिंग लक्ष्मी अर्बन बँकेच्या तिसऱ्या मजल्यावर सहयोग ▶ उर्वरित पान २ वर




*जिल्हाधिकारी कार्यालय बीडचे वर्ग-१ लेखाधिकारी संजय कुलकर्णी यांच्या सेवापूर्तीच्या औचित्याने त्यांच्या 'करवीर' या निवासस्थानी आयोजित सेवापूर्तीच्या कार्यक्रमानिमित्त श्री.संजय कुलकर्णी यांच्याप्रती आपुलकी-स्नेह व शुभेच्छांचे भाव व्यक्त करतांना राहुल गिरी छायाचित्रात दिसत आहेत.*

## सामाजिक संस्थांनी रक्तदान शिबिरे आयोजन करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

तरी या पार्श्वभूमीवर जिल्हयातील सर्व सामाजिक संस्था, शैक्षणीक संस्था, स्वयंसेवी संघटना व विविध मंडळ यांनी जास्तीत जास्त रक्तदान शिबीरे आयोजीत करुन या सामाजीक कार्यात सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक व रक्तपेढी अधिकारी यांनी केले आहे.




रक्तदान शिबीर आयोजीत करु इच्छिणा-या संस्थानी जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढी विभाग येथे संपर्क साधवा रक्तदान शिबीरासाठी आवश्यक सर्व मार्गदर्शन व तांत्रिक सहकार्य रुग्णालया मार्फत करण्यात येईल.जिल्हा रुग्णालय बीड येथे सध्या रक्त संकलन केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा जाणवत असून सद्य:स्थितीमध्ये रक्तदान शिबीरे व रक्तदान करणा-यांची संख्या खूप कमी झाल्यामुळे रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. रुग्णालयात विविध शस्त्रक्रिया आपत्कालीन रुग्णसेवा तसेच अपघातग्रस्त रुग्णांच्या उपचारासाठी व प्रसुती महिलांना रक्ताची अत्यंत आवश्यकता असते. इच्छुक सामाजिक संस्थानी रक्तदान शिबिरे आयोजनासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधवा.

संपर्क अधिकारी/कर्मचारी यांचे नाव :- १. श्री खेडकर आर.एस. रक्तपेढी तंत्रज्ञ, जि.रु.बीड - ९४२१८३८८०३

२.श्री काळे जे.पी.प्रयोगशाळा तंत्रज्ञ, जि. रु. बीड ९४२०५७८४६२/९८२२६०१८०२

३. श्रीमती प्रभा गालफाडे, रक्तपेढी तंत्रज्ञ, जि.रु. बीड-७८८७५२३९६३

४.सिव्हिल सर्जन जिल्हा रुग्णालय, बीड.

## विशेष घटक योजनेसाठी ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत

**बीड । प्रतिनिधी**

विशेष घटक योजनाः (सन २०२५-२६ प्राप्त उद्दीष्ट ०६ लाभार्थी) स्वरूपः- प्रकल्प मर्यादा रु. ५००००/- पर्यंत.प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के पर्यंत अनुदान देण्यात येते व राहिलेली ५० टक्के रक्कम बँके मार्फत देण्यात येते. उदा. (२५ हजार अनुदान २५ हजार बँक रक्कम बँक कर्जावर बँकेच्या नियमा प्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधरणपणे ३ वर्षात करण्याची आहे. बीजभांडवलः (सन २०२५-२६ प्राप्त उद्दीष्ट ०६ लाभार्थी)

स्वरूपः-प्रकल्प मर्यादा:- ०५ लाखापर्यंत प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीजभांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ टक्के द.सा.द.शे. व्याज दराने देण्यात येते. सदर राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. १०,०००/- चा समावेश आहे.बँकेचे कर्ज ७५ टक्के देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज दर आकारण्यात येतो. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेत एकाच वेळेस ठरवुन दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार तीन ते पाच वर्षाच्या ▶ उर्वरित पान २ वर

## गावक-यानी शिबिराचा लाभ घेऊन पशुधनास योग्य ते उपचार व प्रतिबंधात्मक उपाय करून लाभ घ्यावा

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुका गोदावरी व सिंदफणा नदीकाठी वसलेला असल्याने व या वर्षात अति वृष्टी झाल्याने तालुक्यातील पशुधनाची पशुसंवर्धन विभागा मार्फत विशेष काळजी मोहीम शिबिरांच्या माध्यमातून घेण्यात येत आहे.अतिवृष्टी मुळे जनावरांमध्ये लंम्पी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.जनावरांना रोग प्रादुर्भाव होऊ नये म्हणून विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

सर्व प्रथम जनावरांमध्ये गोचीड गोमाशी निर्मुलन करणे ,गोठ्या मध्ये स्वच्छता ठेवणे ,जंत निर्मुलन ,गोठा फवारणी हे प्रथम स्वरुपात केल्याने रोग प्रादुर्भाव बऱ्या पैकी टाळता येतो.या वरही आजाराने शिरकाव केला तर त्या जनावरास विलग करून ठेवावे.लंम्पी रोगप्रादुर्भाव वाढू नये या साठी तालुक्यास ४०१०० त्रेींझेंरलळप प्राप्त झाली असून तालुक्या मध्ये १००टक्के गेवराई तालुका गोदावरी व सिंदफणा नदीकाठी वसलेला असल्याने व या वर्षात अति वृष्टी झाल्याने तालुक्यातील पशुधनाची पशुसंवर्धन विभागा मार्फत विशेष काळजी मोहीम शिबिरांच्या माध्यमातून घेण्यात येत आहे.अतिवृष्टी मुळे जनावरांमध्ये लंम्पी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.जनावरांना रोग प्रादुर्भाव होऊ नये म्हणून विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. सर्व प्रथम जनावरांमध्ये गोचीड गोमाशी निर्मुलन करणे ,गोठ्या मध्ये स्वच्छता ठेवणे ,जंत निर्मुलन ,गोठा फवारणी हे प्रथम स्वरुपात केल्याने रोग प्रादुर्भाव बऱ्या पैकी टाळता येतो.या वरही आजाराने शिरकाव केला तर त्या जनावरास विलग करून ठेवावे. लंम्पी रोगप्रादुर्भाव वाढू नये या साठी तालुक्यास ४०१०० त्रेींझेंरलळप प्राप्त झाली असून तालुक्या मध्ये १००%गोवर्गीय लसीकरण पूर्ण झालेले आहे. तालुक्या अंतर्गत एकूण २५ पशुचिकित्सालय आहेत.व गेवराई तालुक्या मध्ये एकूण १९४ गावे आहेत.पशुसंवर्धन खात्या मार्फत नियोजन व टीम तयार करून प्रत्येक गावात शिबिरे आयोजित केलेली आहेत.शिबिरांच्या माध्यमातून औषधोउपचार व पशुपालका मध्ये जनजागृती करण्यात येत आहे.''गाव तेथे शिबीर '' शेतकऱ्याच्या बांधावर गोठ्या मध्ये फिरते पशुवैद्यकीय वहानाच्या माध्यमातून रोगराई मुक्त तालुका हा विडाच पशुसंवर्धन विभागाने उचलला आहे.या मध्ये फिरते पशुवैद्यकीय वहानाच्या माध्यमातून ,प्रतेक्ष भेटी च्या माध्यमातून प्रत्येक गावात रोगमुक्त शिबीर आयोजित करण्यात आलेआहेत.

मोजे पाडळशिंगी,तांदळा,कोळगाव,खळेगाव,बंगालीपिंपळा, राजपिंपरी,आडगाव काठोडातांडा श्रीपत ▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### जिल्हास्तरीय लोकशाही दिन 03 नोव्हेंबर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार दि. दि. ०३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

### गंगामसला सर्कल च्या पहिल्या टोकापासून तर शेवटच्या टोका पर्यंत संपर्क असणारे जगन खेञी



**माजलगाव । प्रतिनिधी**

गंगामसला जि.प.गट हा ओबीसी साठी आरक्षित करण्यात आला असून मोठेवाडी चे रहिवासी असलेले जगन खेञी एक सक्षम चेहरा म्हणून सर्व परिचित सर्वसामान्यांच्या सुख,दु:खामध्ये धावून जाणारे व्यक्तिमत्व म्हणजे जगन खेञी गंगामसला सर्कल मधील गंगामसला येथील मुंडे साहेब पंकजा ताई महादेव तात्या निर्मळ यांच्या पासून राजकीय कार्यकर्ता म्हणून सुरूवात करुन, आजही ताई च्या परीवाराच्या प्रत्येक राजकीय निर्णयाशी, सहमत होऊन मुंडे घराण्यासोबत राहणारे, माझ्या राजकीय कार्यकर्ता म्हणून सुरुवात मुंडे घराण्यापासुन झाली, आणि शेवटही मुंडे घराण्याशी एकनिष्ठ असलेला कार्यकर्ता म्हणुनच होणार, असे छातीठोकपणे सांगणारे, मोठेवाडी येथील जगन खेञी यांना एकनिष्ठेचे फळ म्हणून, निर्मळ यांनी, गंगामसला सर्कल येथे, गंगामसला जिल्हा परिषद साठी उमेद्वारी द्यावी, ही गंगामसला सर्कल मधील सर्वांची इच्छा आहे. गंगामसला येथे गेली १० वर्षे झाली, ते ग्रामपंचायत सदस्य आहेत, आहेत, सर्कल मधील सर्व समाजाला परीचीत असणारे व्यक्ती आहेत,गागामसल सर्कल मध्ये सर्व समाजातील व्यक्तींना, धरुन चालणारे, गंगामसला सर्कल मध्ये तळागाळातील लोकांपर्यंत संपर्क आहे.मुडे परीवाराशी एकनिष्ठता आहे, म्हणुन जिल्हा परिषद उमेद्वारी, जगन खेञी यांनाच द्यावी ही तळागाळातील लोकांची इच्छा आहे.

### वार्ड क्रमांक एक मधून लक्ष्मण दादा पवळ यांनी निवडणूक लढवावी स्थानिक नागरिकांची मागणी



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेची रणधुमाळी आता काही दिवसात सुरू होणार आहे वार्ड क्रमांक एक मधून सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकनिष्ठ असणारे लक्ष्मण दादा पवळ यांना वार्ड क्रमांक एक मधील नागरिकांची पसंती आहे. गेल्या २० वर्षापासून लक्ष्मण दादा पवळ यांनी वार्ड क्रमांक एक मधील नागरिकांच्या अनेक समस्या सोडवण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे वार्ड क्रमांक एक मधील नागरिकांनी लक्ष्मण दादा पवळ यांना निवडून देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. येत्या काही दिवसांमध्ये ही निवडणूक पार पडणार आहे त्यामुळे स्वच्छ प्रतिमा असणारे लक्ष्मण दादा पवळ यांनीच वार्ड क्रमांक एक मधून उभे राहावे असे नागरिकांमधून बोलले जात आहे. यावर काँग्रेसचे पक्षश्रेष्ठही लक्ष्मण दादा पवळ यांना कितपत न्याया देईल. हे आता पाहणे योगे ठरणार आहे.

### आनंदगाव पंचायत समिती संतोष रासवे यांनी लढवावी : सर्व जनतेची मागणी



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील आनंदगाव पंचायत समिती गण ओबीसी साठी राखीव झाला असल्यामुळे या पंचायत समिती गणनातून समता परिषदेचे युवा नेते संतोष रासवे यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी सर्व समाज बांधवांच्या वतीने करण्यात येत आहे बीड जिल्ह्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे पडघम वाजू लागले आहेत अनेक हौसे, गौसे, आणि नौसे गुडघ्याला बाशिंग बांधून निवडणुकीत उतरण्याची तयारी दाखवत आहेत मात्र त्यासाठी मतदारसंघात किंवा गणात हक्काचे मतदान असावे लागते याचेही भान काही जणांना नसते मात्र समता परिषदेचे युवा नेते संतोष रासवे यांचे सर्व जाती धर्मातले आणि ओबीसी समाजातले हक्काचे मतदार आनंदगाव पंचायत समिती गणात आहेत त्यामुळे उमेदवारी कुठल्याही पक्षाची घ्या मात्र तुम्ही लढा अशी मागणी संतोष रासवे यांच्या बाबतीत होत आहे यासाठी संतोष रासवे यांनी गेल्या आठ दिवसापासून आनंदगाव पंचायत समिती गणातील मतदारांच्या गाठी भेटी घेण्यासाठी दौरा चालू केला आहे दौऱ्यात उत्तम प्रतिसाद मिळत असून आपणच या मतदारसंघातून निवडणूक लढवावी अशी मागणी सर्व जाती धर्मातील जनतेस सकल ओबीसी बांधवांच्या वतीने करण्यात येत आहे.

### रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी मा. आनंदराज आंबेडकर यांचा माजलगाव दौरा



**माजलगाव । प्रतिनिधी**

रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू मा. आनंदराजजी आंबेडकर साहेब यांचा माजलगाव दौरा निश्चित झाला आहे. ते रविवार, दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत छत्रपती संभाजी महाराज चौक, बायपास रोड येथील हॉटेल सुखसागर येथे रिपब्लिकन सेनेच्या कार्यकर्त्यांशी भेट व संवाद साधणार आहेत. यानंतर दुपारी १ वाजून ५ मिनिटांनी, रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा साळवे यांच्या कन्येच्या मंगल परिणय सोहळ्यासाठी मा. आनंदराज आंबेडकर साहेब माऊली लॉन्स, गडी रोड, माजलगाव येथे प्रमुख पाहुणे म्हणून विशेष उपस्थिती दर्शविणार आहेत.